N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): रत्नागिरी **P.S.**(ठाणे): दापोली **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0157 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 22/09/2022 14:01 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार

**Date From** (दिनांक पासून): 21/09/2022

**Time Period** (कालावधी): पहर 5

**Date To** ( दिनांक पर्यंत): 21/09/2022

**Time From** (वेळेपासून): 13:53 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 14:00 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 22/09/2022 **Time** (वेळ): 11:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 019 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 22/09/2022 12:57 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): नगर पंचायत दापोली,दापोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अरविंद शंकर बटावळे 7021150757

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ. क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोकळी पोस्टसाजगाव खालापुररायगड, खालापुर ,खालापूर,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सुकोंडी,बटावळेवाडी, दापोली,दापोली,रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-7021150757

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अक्षय शिवगोंडा पाटील | | | 1. सुकोंडी तादापोली,दापोली,दापोली, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1) 7000/ रु त्यामध्ये 500 रु दराच्या 14 भारतीय चलणी नोटा(सापळा कारवाई दरम्याने लोकसेवक श्री अक्षय प | 7,000.00 |
| 2 | इतर | घरगुती वस्तु | 2) 350 रु Mplus micro SD HC 4GB कंपणीचे मेमरीकार्ड त्याचा नंबर ARY1907 MMEHA64CYLYWB AX2015F1907 Ma | 350.00 |
| 3 | इतर | घरगुती वस्तु | 3)00.00 रु किमतीचे निळसर व पिवळसर रंगाचे बारिक चेक्स चे फुल हाताचे शर्ट ,शर्टच्या कलर दर 38 cm,EAS | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 7,350.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ. क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दिनांक 21/09/2022

मी अरविंद शंकर बटावळे, वय. 42 वर्षे, व्यवसाय- खाजगी नोकरी, सध्या रा. मु. पोकळी, पोस्ट साजगाव, ता. खालापुर, जि. रायगड खोपोली पिन नं. 410203, मुळ रा. घर नं. 92, मु.पो. सुकोंडी बटावळे वाडी, ता. दापोली, जि. रत्नागिरी पिन 415714, मो. नं. 7021150757 समक्ष फिर्याद लिहून देतो की,

मी माझे कुटुंबासह वरील नमुद पत्त्यावर रहात आहे. दिनांक 20/09/2022 रोजी मी श्री. कांबळे, पोलीस निरीक्षक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांना फोनद्वारे माझ्याकडे तलाठी लाच मागत असलेबाबतची तक्रार कळविली होती. त्यानुसार दिनांक 21/09/2022 रोजी पोलीस निरीक्षक श्री. कांबळे, शासकिय पंच व एसीबी स्टाफ यांनी माझे तक्रारीचे अनुशंगाने आझाद मैदान, दापोली येथे माझी भेट घेतली. त्यांना मी माझी तक्रारीची हकीकत तोंडी सांगुन स्वःहस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली त्यातील मजकुर पुढीलप्रमाणे-'' मी वरील ठिकाणी राहणारा आहे. मौजे सुकोंडी, ता. दापोली येथील येसरांब्याचा खोंड या ठिकाणचा सर्व्हे नं.70, हिस्सा नं. 2-3 क्षेत्र 01-19-5 व 0-01-6 एकुण 0-21-1 ही जमीन माझे वडील कै. शंकर बाबु बटावळे यांचे नाव आहे. सदर मालमत्ता त्यांनी स्वंय संपादित केलेली असुन मालमत्ता मृत्यु पश्चात माझे नावावर करणेबाबत माझे वडिलांनी मृत्युपत्र केलेले आहे.

माझे वडील कै. शंकर बाबु बटावळे हे दिनांक 14/01/2022 रोजी मयत झालेले असुन त्यांचे मृत्यु पश्चात मौजे सुकोंडी, ता. दापोली येथील येसरांब्याचा खोंड या ठिकाणचा सर्व्हे नं. 70, हिस्सा नं. 2-3 क्षेत्र 01-19-5 व 0-01-6 एकुण 0-21-1 ही जमीन माझे नावावर होणेसाठी अक्षय पाटील, तलाठी सजा सुकोंडी यांची माहे फेब्रुवारी 2022 रोजी भेट घेतली होती. त्यावेळी तलाठी श्री अक्षय पाटील यांनी माझ्याकडुन विहित नमुन्यामध्ये अर्ज भरुन घेवुन सोबत आवश्यक ती कागदपत्रे घेतली व तुम्हांला सहीसाठी बोलवेण तेव्हा 10,000/-रुपये घेवुन या तुमच

काम लगेच करुन टाकतो असे सांगितले. परंतु त्यावेळी मी दिलेल्या अर्जाची पोच मला दिलेली नाही. तलाठी श्री. अक्षय पाटील हे मागत असलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याची खात्री झाल्याने व तलाठी अक्षय पाटील यांना लाच रक्कम देण्याची माझी इच्छा नाही त्यामुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी यांचेकडे फोनद्वारे तक्रार केलेली होती. लोकसेवक तलाठी  पाटील यांनी आज रोजी मला भेटायला बोलावल्याने मी आज रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो रत्नागिरी येथे पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांची भेट घेवुन माझी लेखी तक्रार देत आहे. तलाठी श्री अक्षय पाटील यांचेशी माझा कोणताही आर्थिक व्यवहार नाही तरी त्यांच्यावर कारवाई करावी ही विनंती आहे. सोबत वडीलांचे मृत्युपत्र व मृत्यु दाखला आहे. वगैरे मजकुराचा अर्ज सादर केला. सदर तक्रारी अर्जावर पंचानी व पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी सह्या केल्या.

सदरचा तक्रारी अर्ज पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी स्वतःच्या ताब्यात घेतला. त्यानंतर मी केलेल्या अर्जाची पडताळणी लोकसेवक तलाठी श्री अक्षय पाटील यांना समक्ष भेटुन करण्यात येणार असल्याचे सांगून, सदर भेटी दरम्यान माझेत व लोकसेवक तलाठी श्री अक्षय पाटील यांचेतील संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डव्दारे मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी पंचाना व मला सांगितले. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी शासकीय वाहनामध्ये सोनी कंपनीचा 5021788 या नंबरचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व नवे सिलबंद  Mplus micro SD HC4GB मेमरी कार्ड आमचे समक्ष हजर केले. मेमरीकार्डचा नंबर भिंगाच्या सहाय्याने पाहीला तो ARY1907 MMEHA64CYLY-WB AX2015F1907 Made in Taiwan असा आहे. पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी स्वतःचे, माझे व पंचांचे पडताळणीसाठी जात असल्याचे निवेदन डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले.

पोलीस निरीक्षक श्री. कांबळे यांनी मला व पंच नं. 1 मोरे यांना लोकसेवक तलाठी श्री अक्षय पाटील यांची भेट झाल्यांनतर दापोली येथील आझाद मैदानावर परत येण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर त्यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या शर्टच्या आतील बाजुस बनियनमध्ये लपविला. मी व पंच नं. 1 मोरे असे दोघे मोटारसायकलने उपविभागीय अधिकारी कार्यालय दापोली येथे गेलो. मी मोटारसायकल वरुन उतरुन जुने सेतु कार्यालय येथे गेलो. माझे मागोमाग पंच नं.1 मोरे दखील जुने सेतु कार्यालयात आले. त्यावेळी लोकसेवक अक्षय पाटील मला कार्यालयाचे बाहेर भेटले. त्यावेळी मी लोकसेवक पाटील यांना नमस्कार निघालेत का? त्यानंतर मी व लोकसेवक पाटील कार्यालयात गेलो. मी लोकसेवक अक्षय पाटील यांना माझ्या कामासंबंधात विचारले. त्यावेळी लोकसेवक अक्षय पाटील यांनी कागद घरी राहीले असल्याचे सांगितले व माझ्याकडुन काही कागदपत्रे घेतली. काही वेळाने मी व लोकसेवक अक्षय पाटील कार्यालयाचे बाहेर येवुन मोटारसायकल जवळ थांबुन होतो. त्यावेळी पंच नं.1 मोरे देखील माझे आसपास थांबुन होते. त्यावेळी मी हे काय ते बघा आज काय.. परत .. परत हेलपाटे नको साहेब... असे बोललो. त्यावर लोकसेवक पाटील यांनी तुमच काय ते देवुन टाका... बघु. काय असेल ते देवुन टाका तुम्ही.. असे सांगितले. त्यावेळी मी तुम्ही सांगा ना..सर.. असे बोललो त्यावर लोकसेवक अक्षय पाटील कमी जास्त काय असेल ते देवुन टाका... मी काय लय मागतो? असे बोलले.त्यावर मी तुम्ही बोललेलात गेल्या वेळी दहा हजार... मग आता मी कसं कमी करु तुम्ही सांगा... असे बोललो. त्यावर लोकसेवक अक्षय पाटील तुम्ही तुमच्या मनाने... दया असे बोलले. त्यावर मी त्यांना सांगा एक आकडा सांगा ओ सर.. असे बोललो. त्यावर लोकसेवक अक्षय पाटील सात करा असे बोलले. त्यावेळी मी सात हजार? असे विचारले असता लोकसेवक अक्षय पाटील हे ..हुं.... असे बोलले. त्यावेळी मी चालेल, कधी पर्यंत होईल.... मी कुठे भेटु तुम्हाला परत.. असे विचारले असता लोकसेवक अक्षय पाटील यांनी इथंच भेटा असे सांगितले. त्यानंतर माझेत कामासंबंधात इतर बोलणे चालु होते. त्या दरम्यान मी सात ना..? असे लोकसेवक पाटील यांना विचारले असता लोकसेवक अक्षय पाटील यांनी होय... असे सांगितले. त्यावर मी 7000/- रुपये ठिक आहे असे बोललो. त्यानंतर अक्षय लोकसेवक पाटील यांनी तुम्हाला मी माणुस जोडुन देतो त्यांचेकडे देवुन ठेवा असे सांगितले. त्यावेळी मी नको सर... ते तुम्हीच करा आपला व्यवहार दोघांचा आहे मध्यस्थी कोण नको असे सांगितले. त्यावेळी अक्षय लोकसेवक पाटील यांनी तुम्हाला मी सांगतो तेवढ ऐका.. नसेल तर मग नको करु... सोडुन दया विषय.. असे बोलले. त्यानंतर मी लोकसेवक अक्षय पाटील यांचे मोटारसायकलवर बसलो परंतु गाडी चालु न झाल्याने मी परत खाली उतरलो व मी नाष्टा करुन येवु का असे विचारले. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी हा.. या.. असे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 1 मोरे एकत्र मोटार सायकलने पडताळणी पथक थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो.

त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी मला व पंच क्र. 1 मोरे यांना घडलेल्या घटनेबद्दल माहीती विचारली. मी व पंच क्र. 1 मोरे यांनी घडलेली हकिकत पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांना सांगितली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी शासकीय वाहनात डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यातील संभाषण मला व पंचाना ऐकविले. त्यामध्ये मी व पंच नं. 1 मोरे यांनी सांगितल्याप्रामणे बोलणे झाल्याचे आढळुन आले. मी माझा व लोकसेवक तलाठी श्री अक्षय पाटील यांचा आवाज ओळखला.

सदर पडताळणीमध्ये लोकसेवक तलाठी श्री अक्षय पाटील यांनी मौजे सुकोंडी येथील माझ्या वडिलांच्या नावावर असलेली जमिन वडीलांच्या मृत्युपश्च्यात वडीलांच्या मृत्युपत्रानुसार सदर जमिन माझे नावावर होणेसाठी जमिनीची फेरफेरा रजिस्टरी नोंद करुन ती नोंद मंडळ अधिकारी यांचेकडे मंजुरीसाठी पाठवुन त्यांचेकडुन नोंद मंजुर झाल्यानंतर सात बारा उतारा देण्यासाठी 7000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याचे व मागणी केलेली लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीमध्ये आढळुण आले. त्यामुळे सापळा कारवाई लगेच आयोजित करणार असल्याचे पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी पंचाना व मला सांगितले.

काही वेळानंतर पोलीस निरीक्षक कांबळे यांचे सुचनेवरुन मी लाचेची रक्कम रुपये 7,000/- (रुपये सात हजार) (त्यामध्ये रुपये 500 दराच्या 14 नोटा) हजर केली. पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांच्या सुचनेवरुन माझी पंच नं. 1 मोरे यांनी अंगझडती घेतली. अंगझडतीत मिळुन आलेल्या चिजवस्तु व रोख रक्कम मला परत केली.

आझाद मैदान दापोली येथे शासकिय वाहनात पोनि श्री. कांबळे यांनी मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट दिवा व अँन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले. अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या वस्तूवर अंधारामध्ये अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता, त्या वस्तूवर अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट चकाकी दिसून येते. नेहमीच्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही असा गुणधर्म असल्याचे सांगितले. मी हजर केलेली लाचेची रक्कम प्रथम नेहमीच्या उजेडात व नंतर शासकिय वाहनात काळया कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात दाखविले त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या. पोनि कांबळे यांच्या सूचनेवरून पोहवा कोळेकर यांनी लाचेची रक्कम एका कागदावर ठेवून नोटांच्या दोन्ही बाजूस हाताच्या बोटाने अँन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर त्यांचे हात व नोटा नेहमीच्या प्रकाशात दाखविले. नोटा अगर त्यांच्या दोन्ही हातांच्या बोटांवर अँन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर शासकिय वाहनात काळया कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून पोहवा कोळेकर यांच्या हातामधील लाच रक्कमेवर पोनि श्री. कांबळे यांनी अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या नोटांवर दोन्ही बाजूस अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तशीच चकाकी पोहवा कोळेकर यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर दिसून आली. त्यानंतर पुन्हा उजेड करण्यात आला. पोनि श्री. कांबळे यांच्या सूचनेवरुन पोहवा कोळेकर यांनी लोकसेवक तलाठी अक्षय पाटील यांना देण्यासाठी  7,000/- रूपये नोटांची घडी करुन माझे शर्टचे डावे खिशात ठेवली व मला पोनि श्री. कांबळे यांनी सूचना दिली की, लोकसेवक तलाठी अक्षय पाटील हे लाचेच्या रक्कमेची मागणी करेपर्यंत व

लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तो पर्यंत त्यांनी सदर लाच रक्कमेला हात लावू नये. तसेच तलाठी आलोसे अक्षय पाटील यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर मी सापळा पथकाला माझा डावा हात डोक्यावरुन फिरवुन तलाठी आलोसे अक्षय पाटील यांनी लाच रक्कम स्विकारल्याबद्दल इशारा करावा असे सांगितले.

सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यांनतर पोनि श्री. कांबळे यांनी सापळा आयोजित करणार असल्याचे सांगितले. तसेच मी तलाठी अक्षय पाटील यांना लाच रक्कम देण्यासाठी त्यांची भेट घेईन त्यावेळी आमच्यातील होणारे संभाषण डि.व्ही.आर. मधील मेमरीकार्ड वर ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री कांबळे यांनी स्वतःचे, माझे व पंचाचे निवेदन मेमरीकार्डमध्ये रेकॉर्डिंग केले. सापळा काइवाईच्या अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

पोनि श्री कांबळे यांनी डि.व्ही.आर चालु करुन माझ्या शर्टच्या आत बनियनमध्ये लपविला. मी व पंच नं. 1 मोरे असे मोटारसायकलने उपविभागीय कार्यालय दापोली येथे गेलो. मी पंच क्र. 1 मोरे यांचे मोटारसायकल वरुन उतरुन जुने सेतु कार्यालय येथे गेलो त्यावेळी पंच नं. 1 मोरे देखील माझे मागोमाग जुने सेतु कार्यालय येथे आले. त्यावेळी माझेत व लोकसेवक पाटील यांचेत कामासंबंधात बोलणे चालु होते. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी मला नोटीसवर सही करण्यास सांगितले त्याप्रमाणे मी सहया केल्या. त्यानंतर मी जमिन नावावर करण्याच्या नमुन्यातील अर्जावर तारखेच्या ठिकाणी त्यांना आजची तारीख लिहण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी सदर अर्जावर व्हाईटनर लावलेल्या ठिकाणी आजची तारीख लिहली. त्यानंतर मी माझे कामाबाबत चर्चा केली. त्यानंतर लोकसेवक पाटील यांनी मला बाहेर थांबण्यास सांगितले त्याप्रमाणे मी बाहेर थांबुन राहिलो. काही वेळाने लोकसेवक पाटील कार्यालयाचे बाहेर आले. त्यावेळी मी हा बर मग आणलेत सात हजार आता कुणाच्या हातात ... तुम्ही घेताय का हातात....असे विचारले त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी हो ...हो, मी जेवायला जाणार आहे. लगेच तुम्हाला सोडतो...झालय दोन मिनटात मी फक्त सांगुन येतो असे सांगितले व परत आत जावुन लगेच बाहेर आले. त्यानंतर मी व तलाठी पाटील मोटारसायकलने कार्यालयाचे बाहेर निघुन गेलो. तसेच पंच नं. 1 मोरे व पोनि कांबळे मोटारसाकलने व पंच नं. 2 गावडे व इतर सापळा पथक शासकिय वाहनाने आमचे मागोमाग रवाना झाले. मोटारसायकलवरुन जात असताना माझेत व लोकसेवक पाटील यांचेत कामासंबंधात बोलणे चालु होते. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी मला कुठे सोडु असे विचारले त्यावेळी मी बस स्टॉपला जाईन असे सांगितले त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी बस स्टॉपला सोडतो तुम्हाला असे सांगुन लोकसेवक पाटील यांनी मला थांबुया इथे का असे विचारले त्यावेळी मी थांबुया असे म्हणालो. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी मोटारसायकल एलआयसी गल्लीत रोडवर थांबवली. त्यावेळी मी मोटारसायकल वरुन खाली उतरुन इथेच देवु का असे विचारले त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी इथेच द्या असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना तुम्ही घेवुन टाका ना इथेच असे बोलुन माझ्या शर्टच्या डाव्या खिशातील लाच रक्कम माझे उजव्या हाताने काढुन लोकसेवक पाटील यांचे समोर धरली व सात हजार बोललेलात...सात हजार दिलेत असे बोललो. त्यावेळी लोकसेवक पाटील यांनी ओके असे म्हणुन सदरची लाच रक्कम स्विकारुन त्यांचे शर्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी मी त्यांना एकदा मोजुन घ्या असे सांगितले त्यावर लोकसेवक पाटील हे ओके ठिक आहे बसा असे बोलले. त्यावेळी मी सापळा पथकास लोकसेवकाने लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इषारा म्हणुन माझा डावा हात माझे डोक्यावरून वारंवार फिरवला. त्यावेळी पोशि/पवार यांनी लोकसेवक पाटील यांना अटकावुन ठेवले. त्यानतर पोनि कांबळे यांनी त्यांचे◌कडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद करून तो स्वतःचे ताब्यात घेतला. लगेचच पोनि कांबळे यांनी लोकसेवक पाटील यांना मोटारसायकलवर बसलेल्या स्थितित त्यांचा उजवा हात व पोशि/पवार यांनी डावा हात पकडुन लोकसेवक यांना 13.53 वाजता ताब्यात घेतले. त्यानंतर पोनि कांबळे यांनी मला माझे हात कषासही लागणार नाही असे स्थितीत रोडच्या बाजुला थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी बाजुला जावून थांबलो.

त्यानंतर पोनि कांबळे यांनी मला किसान भवन येथील शेतकरी हॉल क्रमांक 4 येथे बोलावुन रूममधील लाईट बंद करून काळ्या रंगाचे कपडयाने कृत्रिम अंधार करून माझ्या हातांची अल्ट्राव्हॉयोलेट दिव्याखाली तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताच्या अंगठयासह सर्व बोटांचे पेरांना व षर्टचे पुढील डावे बाजुचे खिषाचे वर व आतील बाजुस अ◌ॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. पंच नं. 1 मोरे यांनी माझी अंगझडती घेतली. त्यामध्ये सापळापुर्व कारवाईचे पुर्वी होत्या तषा वस्तु मिळुन आल्या. पोनि कांबळे यांचे सुचनेवरुन मी माझे हात धुतले.

तरी माझे वडिलानी मौजे सुकोंडी येथील सर्व्हे नं. 70, हिस्सा नं. 2-3 क्षेत्र एकुण 0-21-1 ही जमिन त्यांचे मृत्युपश्चात, माझे नावावर होण्यासाठी मृत्युपत्र केले होते. माझे वडील दिनांक 14/01/2022 रोजी मयत झाल्याने सदरची जमिन माझे नावावर होणेसाठी मी तलाठी सजा सुकोंडी यांचेकडे अर्ज केला होता. सदर जमिनीची फेरफार रजिस्टरी नोंद करुन, नोंद मंडळ अधिकारी यांचेकडे मंजुरीसाठी पाठवुन त्यांचेकडुन नोंद मंजुर झाल्यानंतर सातबारा उतारा देण्यासाठी लोकसेवक तलाठी श्री. अक्षय पाटील, तलाठी सजा माटवण पद्धार सुकोंडी, ता. दापोली, जि. रत्नागिरी यांनी दिनांक 21/09/2022 रोजी 11.50 ते 12.34 या वेळेत उपविभागीय अधिकारी कार्यालय दापोली येथील जुने सेतु कार्यालयाचे आवारात माझेकडे 10,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती 7,000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली व मागणी केलेली लाच रक्कम 7,000/- रुपये दिनांक 21/09/2022 रोजी 13.53 वा. दापोली नगरपरिषद कार्यालया समोरील एल.आय.सी. गल्लीमधील रोडवर स्वीकारल्यानंतर त्याना पंचासमक्ष रंगेहात पकडले म्हणुन माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.

माझा फिर्यादी जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मला वाचून दाखविला व समजावुन सांगितला तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): Ninad Mahadev Kambale
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)
**No.**(क्र.): DGPNMKM8405 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): vivek baburao ahire
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pbmh64160

पोलीस ठाणे अंमलदार
दापोली पोलीस ठाणे

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)